११००३

जा.क्र /२०२४
पर्वती पो.स्टे. पुणे
दि. १० /१२/२०२४



प्रति
मा. सहायक पोलीस आयुक्त,
प्रशासन विभाग,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
यांना सविनय सादर
प्रतिवेदक :-. आर.सी.मोरे, पो.हवा.९९८, पर्वती पो.स्टे. पुणे शहर
याच कडुन विनंती पूर्वक की
विषय :- बेपत्ता महिलेचा तपास होणेकामी पुणे पोलीस गॅझेट प्रसिध्द होणेस विनंती आहे.
संदर्भ -- पर्वती पोलीस ठाणे मनुष्य मिसींग रजि.नंबर -- ८१/२०२४ अन्वये
महोदय,

पर्वती पो.स्टे. मनुष्य मिसिंग रजि.नं.८१/२०२४ मधील खबर देणार महीला नामे उषा जगन्नाथ बनसोडे, वय- ५० वर्षे, काम- फळ विक्री, रा. सर्वे नं.१३०, दांडेकर पुल, सिंहगड रोड पुणे-३० मोबा. नं.-८८३०६७०७११ यांनी खबर दिल्यात म//र की दि. ०५/१२/२०२४ रोजी मी नेहमीप्रमाणे सकाळी ०९/०० वा.चे सुमारास मार्केटयार्ड पुणे येथे कामाला गेले होते. त्यारोजी माझी मुलगी नामे कोमल ही माझेसोबत कामावर आली नव्हती. साधारणतः दुपारी ०३/०० वा. चे सुमारास मी कामावरुन घरी आलेवर माझी मुलगी काजल ही मला घरात दिसली नाही. त्यावेळी मी तीचेबाबत माझी नात नामे रेवा किशोर वाळके वय- १० वर्षे, हीचेकडे विचारणा केली असता ती मला म्हणाली कि, मी शाळेतुन ०२/०० वा.चे सुमारास आले असुन मला आई घरात दिसली नाही. त्यानंतर मी तीला फोन केला असता माझी मुलगी काजल हीचा फोन बंद येत होता. त्यानंतर बराच वेळ झाला तरी ती घरी न आल्याने मी, माझे पती व मुलाने तिचा आमचे घराचे आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. त्यानंतर आम्ही तिचा दांडेकर पुल, सिंहगड रोड, रामकृष्ण मठ, सारस बाग परीसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती मिळुन न आल्याने मी आज रोजी समक्ष चौकीस येवुन तक्रार देत आहे. माझी मुलगी नामे काजल किशोर वाळके, वय-२५ वर्षे हीचे वर्णन खालील प्रमाणे.

नाव - काजल किशोर वाळके, वय-२५ वर्षे, रा. सदर
वर्णन - अंगाने-सडपातळ, उंची-५ फुट २ इंच, रंग-गोरा, चेहरा-उभट, नाक-सरळ, केस-काळे लांब, अंगात- माहीत नाही, भाषा- मराठी, हिंदी बोलते, सोबत एक मोबाईल त्यामध्ये सिम कार्ड नं. ७८२२८४४६७७, नाकात एक बारीक सोन्याची रिंग तसेच जवळ पैसा अडका, मौल्यवान चिजवस्तु काही नाही.

येणे प्रमाणे वरील वर्णनाची माझी मुलगी नामे काजल किशोर वाळके, वय-२५ वर्षे, रा. सदर हि दि. ०५/१२/२०२४ रोजी दुपारी ०१/०० वा. चे सुमारास घरातुन कोणालाही काहीएक न सांगता निघुन गेली आहे. ती घरी परत न आल्याने आज रोजी मी समक्ष दत्तवाडी पोलीस चौकीस येवुन ती मिसिंग झालेबाबत मिसिंग तक्रार देत आहे

तरी वरील वर्णनाचे बेपत्ता महिलेचा तपास होणेकामी पुणे पोलीस गॅझेट प्रसिध्द होणेस विनंती आहे.

मार्फत

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो
पर्वती पो.ठाणे पुणे शहर

मा.सादर व्हावे,
दि.१०/१२/२०२४

( आर.सी.मोरे )
पो.हवा.९९८,
पर्वती पो.स्टे.पुणे

ठाणे अंमलदार
पर्वती पोलीस ठाणे, पुणे शहर

Scanned by Scanner Go